**<u>प्रेसनोट</u>** **दि. 04/03/2026**

**अ‍ॅन्टी करप्शन ब्युरोकडून तलाठी कार्यालय निंबूत येथील खाजगी इसमास तलाठी व मंडलाधिकारी यांचेकरीता लाच मागणी करून स्विकारले प्रकरणी कारवाई केलेबाबत.**

| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | **पुणे** |
|---|---|
| **पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक** | वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण. |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, 1988 चे कलमान्वये |
| **तक्रारदार** | पुरूष, वय 31 वर्ष |
| **आरोपी नाव व कार्यालय** | सोमनाथ संपत महानवर, वय 35 वर्ष, खाजगी इसम, तलाठी कार्यालय निंबूत रा.गडदरवाडी, पोस्ट खंडोबाची वाडी, तालुका बारामती, जि.पुणे |
| **सुरवातीस मागणी केलेली लाच रक्कम** | **रू. 20,000/- (वीस हजार रूपये)** |
| **पडताळणी दरम्यान लाच मागणी** | **रू. 15,000/- (वीस हजार रूपये)** |
| **सापळा कारवाई वेळी स्विकारलेली लाच रक्कम** | **रू. 15,000/- (वीस हजार रूपये)** |
| **पडताळणी दिनांक** | दि. 26/02/2026, 04/03/2026 |
| **सापळा दिनांक** | दि. 04/03/2026 |
| **ठिकाण** | बारामती निरा रोड, इंडीयन ऑईल पेट्रोल पंपाजवळ, निंबुत खंडोबाचीवाडी येथे |
| **सापळा अधिकारी यांचे नाव व पद** | श्रीमती आसावरी शेडगे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि, पुणे (मो.क्र. 8425808058) |
| **तपास अधिकारी यांचे नाव व पद** | श्री. सुहास हट्टेकर, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि, पुणे (मो.क्र. 9881873330) |

**थोडक्यात माहिती :-** यातील तक्रारदार हे व्यवसायाने शेती करीत असून तक्रारदार यांची मौजे निंबूत येथे गट क्रमांक 86/2/प्लॉट नं/3 याठिकाणी 6 गुंठ्याचे प्लॉट आहेत. सदर प्लॉट ची भूमिअभिलेख कार्यालय बारामती मार्फत मोजणी करून फाळणीप्रमाणे क.जा.प केले आहे. उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय बारामती यांनी तक्रारदाराच्या फाळणी करण्यात आलेल्या प्लॉट च्या 7/12 नोंदी करण्याकरिता तहसीलदार, बारामती यांना पत्राने कळविले असून त्याप्रमाणे तहसीलदार बारामती यांनी तक्रारदाराच्या फाळणी केलेल्या 4 प्लॉट चे सातबारा उता-यावर नोंदी करण्यासाठी निंबूत गावचे तलाठी जयश्री तनपुरे यांना दि. 11/2/2026 रोजीच्या पत्रान्वये आदेशीत केले आहे.

दि.18/2/2026 रोजी तक्रारदार यांनी निंबुत तलाठी कार्यालयात जाऊन चौकशी केली असता तेथे हजर असलेले कोतवाल (यातील अटक आरोपी) याने सातबारा नोंदी साठी तलाठी जयश्री तनपुरे व मंडळ अधिकारी मोहिते यांच्यासाठी तक्रारदाराच्या एका प्लॉट साठी 5,000 प्रमाणे एकूण चार प्लॉटच्या नोंदीसाठी 20,000 रुपये द्यावे लागतील असे बोलून तलाठी जयश्री तनपुरे व सर्कल मोहिते यांचेकरिता 20,000 रुपये लाचेची मागणी केल्याबाबतची तक्रार तक्रारदार यांनी दि.25/02/2026 रोजी अँटी करप्शन ब्युरो पुणे येथे दिली होती.

तक्रारदाराने दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि.26/2/26 रोजी लाच मागणी पडताळणी कारवाई केली असता आरोपी सोमनाथ संपत महानवर यांनी तक्रारदार यांचे 4 प्लॉट च्या सातबारा नोंदी करण्याकरिता तलाठी जयश्री तनपुरे यांचेकरिता 5 ते 6 हजार व मंडल अधिकारी मोहिते यांचेकरिता 20,000 रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

दि.3/3/2026 रोजी तक्रारदार यांनी कोतवाल महानवर यांच्याकडे कामाबाबत फोनवरून चौकशी केली असता कोतवाल यांनी तक्रारदार यांच्या 4 प्लॉट बाबत तलाठी यांनी सातबारा नोंद घेतल्याचे सांगून 'पेमेंट पाठवा' असा व्हाट्सएप मेसेज पाठविला.

दि.4/3/2026 रोजी लाच मागणी पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार यांनी परत एकदा कोतवाल महानवर यांची भेट घेतली असता मंडलाधिकारी मोहिते हे तुमच्याशी पैश्याबाबत बोलणार नाहीत असे बोलून आरोपी कोतवाल सोमनाथ महानवर यांनी तक्रारदाराकडे मंडळ अधिकारी श्री मोहिते यांचेकरिता तडजोडीअंती 15,000/- रुपयाची लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

आज दि.4/03/2026 रोजी 17.25 वाजता बारामती निरा रोड, इंडीयन ऑईल पेट्रोल पंपाजवळ, निंबुत खंडोबाचीवाडी येथे करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान यातील आरोपी सोमनाथ महानवर यांनी मंडल अधिकारी मोहिते यांचेकरिता तक्रारदार यांचेकडून 15,000/- रुपये लाच स्वीकारली असता आरोपी महानवर यांना रंगेहात पकडण्यात आले त्यानंतर आरोपी सोमनाथ महानवर हा कोतवाल नसून तो खाजगी इसम असल्याचे निष्पन्न झाले आहे.

आरोपीविरूद्ध वडगाव निंबाळकर पोलीस ठाण्यामध्ये भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा अधिनियम 1988 चे कलमान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

**सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि. पुणे, अपर पोलीस अधीक्षक श्री. अर्जुन भोसले, ला.प्र.वि. पुणे, यांचे**

मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली. लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे (मो.क्र. 9823167154) तसेच अपर पोलीस अधीक्षक-1 श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि.,पुणे (मो.क्र. 9029030530) यांनी केले आहे.

1) **ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे- दुरध्वनी क्रमांक** -020-26122134, 26132802, 26050423, 9403781064
2) **व्हॉट्स-ॲप क्रमांक - 9403781064 (पुणे)**, 9930997700 **(मुंबई)**
3) **ई-मेलआयडी - पुणे** dyspacbpune@mahapolice.gov.in
4) **वेबसाईट** - https://acb.maharashtra.gov.in
5) **ऑनलाईन तक्रार करणेसाठी** – https://acb.maharashtra.gov.in/bribe-compliant



दयानंद गावडे
सहा.पोलीस आयुक्त / पो. उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.